# मरोळ भुयारी मार्गावर होणार मेट्रोची चाचणी

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

आरेतील कारशेड प्रकरणी वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या कुलाबा ते सीप्झ मेट्रो -३ मार्गासाठी रेल्वेची चाचणी मरोळ मरोशी येथे करण्यात येणार आहे. आरे येथील वादग्रस्त जागेच्या हद्दीबाहेर ही चाचणी करण्यात येणार असून, चाचणी दरम्यान आरेतील एकाही वृक्षाला धक्का लागता कामा नये, असा आदेश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिला आहे.



मेट्रो-३ साठी अल्स्टॉम या कंपनीने श्रीसिटी आंध्रप्रदेश येथे ८ डब्यांची मेट्रो रेल्वे तयार केली आहे. त्या ठिकाणी मेट्रोची तांत्रिक चाचणी झाली असून, आता मुंबईत १० हजार किमी अंतराची चाचणी घेण्यात येईल. कुलाबा ते सीप्झ या मार्गिकेवर या चाचण्या यशस्वी झाल्यानंतर अशा पध्दतीच्या ३१ ट्रेन या मार्गावर धावण्याकरिता उपलब्ध होणार आहेत.

आरे कारशेडचा वाद सुरू असल्याने आरे नजीकच आता ट्रेनच्या चाचणीसाठी पर्यायी व्यवस्था उभारावी लागणार आहे. त्यासाठी किमान दोन महिने लागतील. सध्या मरोळ मरोशी या रस्त्याच्या भुयारी मार्गाचे काम चालू असून या कामाच्या जवळच रॅम्प बनवून काम हाती घेण्यात येणार आहे. या चाचणीच्या कामाकरिता कोणतेही झाड तोडण्यात येणार नाही.